# प्रेस नोट

## हडपसर पोलीसांकडून हडपसर परिसरातील बेकायदेशिर पथारीवाले यांचेवर कायदेशिर कारवाई

दिनांक २८/०९/२०१८ रोजी सकाळी १३/०० वा. दरम्यान हडपसर पोलीस स्टेशन हद्दीतील गाडीतळ,मंत्रीमार्केट,गांधीचौक,कामधेनु इस्टेट,माळवाडी रोड,पुणे सोलापुर रोड परिसरातील मुख्य रस्त्यावर व फुथपाथवर दोन्ही बाजुने अनधिकृत पथारीवाले आपले दुकान मांडुन रोडवर गर्दी करुन येणा-या जाणा-या वाहतुकीस व पायी चालणा-या लोकांना अडथळा निर्माण करुन वाहतुक कोंडी करीत असले बाबत नागरीकांच्या वारंवार पो.स्टे.ला तक्रारी प्राप्त झाल्याने हडपसर पोलीस स्टेशनच्या वतीने सदर बेकायदेशिर रित्या रोडवर दोन्ही बाजुस आपले दुकान टाकुन व्यवसाय करीत असलेल्या एकुण ५४ पथारीवाल्यांवर महाराष्ट्र पोलीस ॲक्ट क.१०२,१०३/११७ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा.सुनिल फुलारी अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग, मा.प्रकाश गायकवाड पोलीस उप आयुक्त परिमंडळ ५ पुणे,मा.सुनिल देशमुख सहा. पोलीस आयुक्त हडपसर विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली मा.सुनिल तांबे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन व शिवाजी शिंदे पोलीस निरीक्षक गुन्हे,व पोलीस स्टेशनकडील पोलीस कर्मचारी यांच्या पथकाने केली आहे.सदर कारवाईस स्वतः मा.प्रकाश गायकवाड पोलीस उप आयुक्त परिमंडळ ५ पुणे,हे हजर होते.

हडपसर परिसरात बेकायदेशिर रित्या रोडवर व्यवसाय करणा-या पथारीवाल्यांवर दररोज अशीच जोरदार कारवाई करण्यात येणार असल्याचे मा.प्रकाश गायकवाड पोलीस उप आयुक्त परिमंडळ ५ पुणे यांनी सांगितले.